भारतीय रिज़र्व बैंक

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in

आरबीआय/२०१२-१३/५२

युबीडी.बीपीडी(पीसीबी).एमसी.क्र.१५/१२.०३.०००/२०१२-१३ जुलै २, २०१२

सर्व प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

महोदय,

**वैधानिक राखीव निधी ठेवण्यावरील महापरिपत्रक**

**प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांद्वारे कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर) ठेवला जाणे**

कृपया वरील विषयावरील आमचे महापरिपत्रक युबीडी.सीओ.पीसीबी.एमसी.क्र.१५/१२.०३.०००/२०११-१२ दि. जुलै १, २०११ चा संदर्भ घ्यावा. सोबतच्या महापरिपत्रकात, ह्या विषयावरील जून ३०, २०१२ पर्यंत दिल्या गेलेल्या (जोडपत्रात निर्देश केलेल्या) सर्व सूचना/मार्गदर्शक तत्वे एकत्रित करण्यात आली आहेत.

आपला

(ए उद्‌गाता)

प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

सोबत - वरील प्रमाणे.

नागरी बँक विभाग, केंद्रिय कार्यालय, गारमेंट हाऊस, पहिला मजला, डॉ. एबी रोड, वरळी, मंबई – ४०००१८, भारत, फोन **-०२२ - २४९३ ९९३० – ४९, फॅक्स -०२२ - २४९७ ४०३० / २४९२ ०२३१, ईमेल-** rbiubdco@rbi.org.in

## वैधानिक राखीव निधी ठेवण्यावरील महापरिपत्रक

## प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांद्वारे कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर) ठेवला जाणे

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ३ |
| २. | सर्वसाधारण | ३ |
| ३. | युसीबींसाठी कॅश रिझर्व | ३ |
| ४. | अनुसूचित युसीबींसाठी रोख राखीव निधी | ८ |
| ५. | वैधानिक लिक्विडिटी रिझर्वज (अनुसूचित व अननुसूचित युसीबी) | ९ |
| ६. | जोडपत्र १ | १६ |
| ७. | जोडपत्र २ | २१ |
| ८. | जोडपत्र ३ | २५ |
| ९. | जोडपत्र ४ | २६ |
| १०. | जोडपत्र ५ | ३१ |
| ११. | जोडपत्र ६ | ३३ |
| १२. | जोडपत्र ७ | ३४ |
| १३. | जोडपत्र ८ | ३६ |
| १४. | जोडपत्र ९ | ३९ |
| १५. | परिशिष्ट | ४३ |

**महापरिपत्रक**

**वैधानिक राखीव निधी ठेवणे**

**प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांद्वारे कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर) ठेवला जाणे**

(१) **प्रस्तावना**

(१.१) सर्व प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांनी (युसीबी)(अनुसूचित आणि अन-अनुसूचित) कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) आणि स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर) ह्यांचा सशर्त स्तर ठेवणे आवश्यक आहे

(१.२) कॅश रिझर्वच्या बाबतीत, अनुसूचित युसीबी, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (आरबीआय अधिनियम १९३४) च्या कलम ४२(१) च्या तरतुदींनुसार नियंत्रित असतील तर अन-अनुसूचित युसीबींना, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (सहकारी सोसायट्यांना लागु असण्याप्रमाणे) बी आर अधिनियम १९४९ (एएसीएस) च्या तरतुदी लागु होतील.

(१.३) त्याच जागी असलेल्या कलम २४ च्या तरतुदी सर्व बँकांसाठी (अनुसूचित व अन-अनुसूचित) एसएलआर ठेवण्याबाबत लागु असतील.

(१.४) ह्या परिपत्रकाच्या तारखेस कार्यवाहीत असणा-या ह्या सर्व मुद्दयांवरील सूचना पुढील परिच्छेदांमध्ये दिल्या आहेत.

**(२) सर्वसाधारण**

(२.१) निरनिराळ्या प्रकारचे फॉर्म्स/अहवाल, बँकिंग रेग्युलेशन (सहकारी सोसायट्या) नियम, १९६६ मध्ये दिले आहेत.

(२.२) बँकेच्या दैनंदिन लिक्विडिटी स्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी, सर्व युसीबींनी, जोडपत्र ८ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार, कॅश रिझर्वची दैनंदिन स्थिती व बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम १८ व २४ खाली ठेवावयाचे लिक्विड ॲसेट्स दर्शविणारे रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे.

(२.३) हे रजिस्टर दररोज ठेवले जाण्याचे काम एखाद्या जबाबदार अधिका-याला दिले जावे आणि ते रजिस्टर, दररोज व्यवहार समाप्तीनंतर स्टॅट्युटरी लिक्विडिटीच्या आवश्यकतांचे पालन करण्याबाबत जबाबदार असलेल्या मुख्य कार्यकारी अधिका-याला सादर केले जावे.

(२.४) ह्या रजिस्टरच्या निरनिराळ्या शीर्षकांखालील आकडे देण्यासाठी, फॉर्म १ च्या तळटीपा म्हणून ह्या नियमांचा एक भाग म्हणून असलेल्या प्रत्येक बाबीसाठी असलेली स्पष्टीकरणे जोडपत्र ९ मध्ये दिलेली आहेत. तथापि, नोंद घेतली जावी की, अनुसूचित युसीबींनी, सीआरआर आवश्यकता काढण्याचे कार्य, आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४२ अनुसारच करणे आवश्यक आहे.

**(३) अनुसूचित युसीबींसाठी कॅश रिझर्व**

**(३.१) वैधानिक सीआरआर आवश्यकता**

ह्या आधी, आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४२(१) अनुसार, युसीबींनी, त्या पंधरवड्यात, मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी मिळालेला, त्यांच्या भारतामधील एकूण डिमांड ॲंड टाईम लायाबिलिटीज (डीटीएल) च्या ३% एवढी किमान सरासरी दैनिक शिल्लक रिझर्व बँकेत ठेवणे आवश्यक होते. ह्याशिवाय, राजपत्रित अधिसूचनेच्या द्वारे, हा दर डीटीएलच्या १५% पर्यंत वाढविण्याचे अधिकार रिझर्व बँकेला देण्यात आले होते. आरबीआय अधिनियम, १९३४,

संसदेद्वारा जून २००६ मध्ये सुधारित करण्यात आला आणि भारतीय रिझर्व बँक (ॲमेंडमेंट) बिल, २००६, एप्रिल १, २००७ पासून जारी करण्यात आले. ह्या सुधारणेनुसार, आरबीआय अधिनियम, १९३४ च्या कलम ४२ चे उपकलम (१) सुधारित केले गेले व त्यानुसार, देशामध्ये आर्थिक स्थिरता ठेवण्यासाठी आवश्यक म्हणून, कोणताही पायाभूत किंवा वरचा दर न ठेवता, अनुसूचित बँकांसाठी सीआरआर विहित करण्याचे अधिकार रिझर्व बँकेला देण्यात आले. त्यानुसार, एप्रिल १, २००७ पासून, देशामधील अर्थव्यवस्था स्थिर ठेवण्यासाठी, रिझर्व बँक, कोणताही पायाभूत किंवा वरचा दर न ठेवता, अनुसूचित युसीबींसाठी सीआरआर विहित करत आली आहे.

### (३.२) वाढीव (इंक्रीमेंटल) सीआरआर

आरबीआय अधिनियम, १९३४ च्या कलम ४२(आय) अनुसार, अनुसूचित युसीबींनी, ह्या अधिनियमाच्या कलम ४२(आय) खाली ठेवावयाच्या विहित शिल्लके व्यतिरिक्त, एक अतिरिक्त सरासरी दैनंदिन शिल्लक ठेवणे आवश्यक आहे - आणि ह्या शिल्लकेची रक्कम, रिझर्व बँकेने वेळोवेळी राजपत्रातून प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेत विहित केलेल्या रकमेपेक्षा कमी नसावी. अशी अतिरिक्त शिल्लक, ह्या अधिसूचनेमध्ये विहित केलेल्या तारखेस व्यवहारांच्या समाप्तीला त्या बँकेच्या एकूण डीटीएलपेक्षा, त्या बँकेची एकूण डीटीएल (आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४२(२) मध्ये संदर्भित अहवालात दाखविलेली) किती जास्त आहे ह्या संदर्भाने काढली जाईल.

सध्या रिझर्व बँकेने कोणताही वाढीव सीआरआर विहित केलेला नाही.

### (३.३) सीआरआरसाठी बहुविध योजना

सीआरआर व एसएलआर ठेवण्यासाठी, रिझर्व बँक, वेळोवेळी, कोणत्याही व्यवहारासाठी किंवा व्यवहारांच्या वर्गाच्या संदर्भाने, असे व्यवहार एखाद्या अनुसूचित युसीबीची भारतामधील जबाबदारी/दायित्व असल्याचे विहित करु शकते.

### (३.४) सीआरआर ठेवणे

सध्या, मार्च १०, २०१२ पासून सुरु होणा-या पंधरवड्यापासून, रिझर्व बँकेने विहित केलेला सीआरआर, त्या बँकेच्या एकूण डीटीएलच्या (कलम ३.११ मध्ये चर्चा केलेल्या सूटींसाठी तडजोड करुन) ४.७५ टक्के एवढा असेल. सीआरआरच्या योजनेमधील आणलेल्या बदलांची सूचि खालील कोष्टकात दिली आहे.

| लागु असलेली तारीख (पासून सुरु होणा-या पंधरवड्यापासून) | निव्वळ डिमांड व टाईम लायाबिलिटीजवरील सीआरआर (%) |
|---|---|
| जानेवारी ६, २००७ | ५.५० |
| फेब्रुवारी १७, २००७ | ५.७५ |
| मार्च ३, २००७ | ६.०० |
| एप्रिल १४, २००७ | ६.२५ |
| एप्रिल २८, २००८ | ६.५० |
| ऑगस्ट ०४, २००७ | ७.०० |
| नोव्हेंबर १०, २००७ | ७.५० |
| एप्रिल २६, २००८ | ७.७५ |
| मे १०, २००८ | ८.०० |

| | |
|---|---|
| मे २४, २००८ | ८.२५ |
| जुलै ५, २००८ | ८.५० |
| जुलै १९, २००८ | ८.७५ |
| ऑगस्ट ३०, २००८ | ९.०० |
| ऑक्टोबर ११, २००८ | ६.५० |
| ऑक्टोबर २५, २००८ | ६.०० |
| नोव्हेंबर ८, २००८ | ५.५० |
| जानेवारी १७, २००९ | ५.०० |
| फेब्रुवारी १३, २०१० | ५.५० |
| फेब्रुवारी २७, २०१० | ५.७५ |
| एप्रिल २४, २०१० | ६.०० |
| जानेवारी २८, २०१२ | ५.५० |
| मार्च १०, २०१२ | ४.७५ |

### (३.५) दैनंदिन धर्तीवर सीआरआर ठेवणे

बँकांना लवचिकता देण्यासाठी आणि त्यांच्या अंतर्गत काळातील कॅश फ्लोवर अवलंबून राखीव निधी ठेवण्यासाठी योग्य ते डावपेच निवडता येण्यासाठी, अनुसूचित युसीबींना सध्या, मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या, त्यांच्या निव्वळ डिमांड व टाईम लायाबिलिटीज (एनडीटीएल) वर आधारित, विहित सीआरआर शिल्लकेच्या ७०% एवढी सरासरी दैनंदिन शिल्लक ठेवणे आवश्यक आहे.

### (३.६) सीआरआर काढणे

बँकांद्वारे रोख रकमेचे व्यवस्थापन करण्यासाठी, सुलभीकरणाचा एक उपाय म्हणून, अनुसूचित बँकांद्वारे वैधानिक सीआरआर ठेवला जाण्यासाठी, दोन आठवड्यांचा विलंब (लॅग) ठेवण्यात आला आहे. अशा रितीने, नोव्हेंबर ६, १९९९ रोजी सुरु होणा-या पंधरवड्यापासून, प्रत्येक बँकेने, मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी, तिच्या एनडीटीएलवर आधारित असा विहित सीआरआर एका पंधरवड्यात ठेवणे आवश्यक आहे (म्हणजे, शुक्रवार दि. ऑक्टोबर २२, १९९९ रोजी असलेल्या एनडीटीएलवर आधारित - अशा प्रकारे).

### (३.७) सीआरआरसाठी एनडीटीएल काढणे

(१) एखाद्या बँकेवरील जबाबदा-या/दायित्वे ही, डिमांड किंवा टाईम डिपॉझिट्सच्या किंवा इतर जबाबदा-यांच्या संकीर्ण बाबींच्या स्वरुपात असू शकतात. आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४२ खाली व्याख्या केल्यानुसार, बँकेच्या जबाबदा-या ह्या बँकिंग प्रणाली किंवा इतर असू शकतात. डिमांड लायाबिलिटीज मध्ये मागणी केल्यावर देय असलेल्या सर्व जबाबदा-यांचा समावेश आहे. टाईम लायाबिलिटीज् म्हणजे मागणी सोडून अन्य प्रकारे देय असलेल्या जबाबदा-या. आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४२(१)(क) अन्वये, कोणत्याही प्रकारच्या जबाबदारीचे वर्गीकरण करण्याचा अधिकार रिझर्व बँकेला देण्यात आला आहे आणि म्हणून कोणत्याही प्रकारच्या जबाबदारीचे वर्गीकरण करण्याबाबत शंका उद्भवल्यास, त्याबाबतच्या स्पष्टीकरणासाठी बँकांनी रिझर्व बँकेकडे जावे.

(२) डीटीएल, बँक प्रणालीबाबतच्या जबाबदा-या व बँक-प्रणालीबाबतचे ॲसेट्स, एनडीटीएल इत्यादी काढण्याच्या रीती जोडपत्र १ मध्ये दिल्या आहेत.

**(३.८) विदेशातील बँकांकडून कर्जे**

भारतातील बँकांद्वारे, विदेशातून कर्जे/उधार घेणे हे लायाबिलिटीज् टु अदर्स समजले जाईल आणि त्यासाठी विशेष आवश्यकता असतील.

**(३.९) प्रेषण सुविधांसाठी संगत (कॉरेस्पॉंडंट) बँकांबरोबर करार**

जेव्हा एखादी बँक तिच्या प्रेषण सुविधेखाली एखाद्या ग्राहकाकडून निधी स्वीकारते तेव्हा ते तिच्या पुस्तकात एक दायित्व (लायाबिलिटी) होते (इतरांच्या संबंधाने दायित्व). संगत बँकेने, स्वीकारकर्त्या बँकेने तिच्या ग्राहकांना दिलेल्या ड्राफ्ट्सचा मान ठेवल्यानंतरच त्या बँकेचे दायित्व समाप्त होते. त्यामुळे, प्रेषण सुविधा योजनेखाली, स्वीकारकर्त्या बँकेने तिच्या संगत बँकेवर दिलेल्या ड्राफ्ट्सबाबतची शेष (बॅलन्स) रक्कम व न दिलेला भाग हा, स्वीकारकर्त्या बँकेच्या पुस्तकांमध्ये, लायाबिलिटीज् टु अदर्स इन इंडिया ह्या शीर्षकाखाली, एक बाहेरचे दायित्व म्हणून परिवर्तित केली गेली पाहिजे आणि ती रक्कम सीआरआर/एसएलआर काढण्यासाठी एनडीटीएल काढण्यासाठी हिशेबात घेतली गेली पाहिजे.

संगत बँकांना मिळालेली रक्कम त्यांनी लायाबिलिटी टु बँकिंग सिस्टिम म्हणून दाखवावी, - लायाबिलिटी टु अदर्स म्हणून नव्हे आणि हे दायित्व, संगत बँकांद्वारे, आंतर-बँकीय ॲसेट्स विरुध्द नेट-ऑफ केले जाऊ शकते. त्याचप्रमाणे, ड्राफ्ट/व्याज, डिव्हिडंडचे वॉरंट देणा-या बँकांनी ठेवलेल्या रकमा ॲसेट्स विथ बँकिंग सिस्टिम म्हणून त्यांच्या पुस्तकात समजल्या जाव्यात आणि त्यांच्या आंतर-बँकिंय दायित्वांविरुध्द त्यांचे नेट-ऑफ केले जावे.

**(३.१०) विदेशी मुद्रा अनिवासी (बँका) एफसीएनआर (बी) ठेवींमधून व आतंर-बँकिंय विदेशी मुद्रा (आयबीएफसी) ठेवींमधून कर्जे**

फॉर्म अ मध्ये अहवाल पाठवितांना, एफसीएनआर (बी) ठेव योजना व आयबीएफसी ठेवींमधील कर्जे, बँक-क्रेडिटचा एक भाग म्हणून समाविष्ट केली जावीत. अहवाल पाठविण्यासाठी, बँकांनी त्यांच्या एफसीएनआर (बी) ठेवी, विदेशातील विदेशी मुद्रेतील ॲसेट्स व भारतामधील चार महत्वाच्या चलनांमधील बँक-क्रेडिट ह्यांचे, अहवाल पाठविण्याच्या शुक्रवारी, फॉरिन एक्सचेंज डीलर्स असोशिएशन ऑफ इंडिया (फेडाई) ह्यांच्या दुपारच्या (नून) मध्यम दराने रुपयांमध्ये रुपांतरण करावे.

**(३.११) सूट असलेले वर्ग**

पुढील दायित्वांबाबत अनुसूचित युसीबींना सीआरआर ठेवण्यासाठी सूट दिलेली आहे

(१) आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४२ (आय) च्या स्पष्टीकरणामधील खंड (ड) खाली काढलेल्या लायाबिलिटीज टु दि बँकिंग सिस्टिम

(२) एसीयु (युएस ) खात्यांमधील क्रेडिट बॅलन्स.

(३) पुढील आदेश दिले जाईपर्यंत, युसीबींना, त्यांनी (परिपत्रक युबीडी.बीपीडी.(पीसीबी).सीआयआर. क्र.४१/१२.०५.००१/२००८-०९ दि. जानेवारी २९, २००९ परिपत्रक दि. डिसेंबर १५, २००८ सह वाचित). आयडीबीआय बँक लि. मधील चालु खात्यात जमा केलेल्या रकमेपर्यंत, बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम १८ खाली सीआरआर ठेवण्यापासून किंवा बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम ५६ सह वाचित

कलम २४ खाली, रोख रक्कम, सोने किंवा भार-रहित (अनएंकबर्ड) मान्यताप्राप्त सिक्युरिटीज् ठेवण्याच्या दायित्वापासून सूट दिली आहे.

**(३.१२) रोख शिल्लक ठेवणे**

सीआरआर ठेवण्यासाठी, प्रत्येक अनुसूचित बँकेने, त्या बँकेचे मुख्य कार्यालय असलेल्या ठिकाणी असलेल्या, आरबीआयच्या डिपॉझिट अकाऊंट्स विभागामध्ये (डीएडी) एक प्रिंसिपाल अकाऊंट ठेवणे आवश्यक आहे.

**(३.१३) रिझर्व बँकेत ठेवलेल्या सीआरआर शिल्लकेवर व्याज नाही**

आरबीआय अधिनियम १९३४ मध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार, कलम ४२ च्या पोट कलम (१ब) वगळल्यास, मार्च ३१, २००७ पासून सुरु झालेल्या पंधरवड्यापासून, अनुसूचित युसीबींनी ठेवलेल्या सीआरआर शिल्लकांवर रिझर्व बँक कोणतेही व्याज देत नाही.

**(३.१४) अहवालाच्या आवश्यकता**

(१) आरबीआय अधिनियम, १९३४ च्या कलम ४२(२) अनुसार, प्रत्येक अनुसूचित युसीबीने, प्रत्येक एक सोडून पुढच्या शुक्रवारी व्यवसाय बंद झाल्यावर, अहवालाच्या संबंधित तारखेनंतर सात दिवसांच्या आत, संबंधित माहिती असलेला व बँकेच्या दोन जबाबदार अधिका-यांची सही असलेला अहवाल, [फॉर्म ब, जोडपत्र २] रिझर्व बँकेकडे पाठविणे आवश्यक आहे. पराक्रम्य संलेख अधिनियम १८८१ खाली अशा दुस-या (आल्टरनेट) शुक्रवारी बँकेच्या एक किंवा अधिक कार्यालयांना सार्वजनिक सुट्टी असल्यास, ह्या अहवालात त्या कार्यालयांबाबत आदल्या दिवशीचे आकडे दिले जावेत परंतु तो अहवाल त्या शुक्रवारचाच समजला जावा.

(२) वरील अहवालासाठी जेथे महिन्यातील शेवटचा शुक्रवार हा आड-शुक्रवार (आल्टरनेट) नसेल तेथे बँकांनी, रिझर्व बँकेकडे, फॉर्म ब मध्ये, अशा शेवटच्या शुक्रवारी, किंवा असा शेवटचा शुक्रवार, पराक्रम्य संलेख अधिनियम १८८१ खाली सार्वजनिक सुट्टीचा असल्यास, त्या आधीच्या दिवशी व्यवहार बंद झाल्यावरची, वर विहित केलेली माहिती, त्या अहवालाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत पाठवावी.

(३) आरबीआय अधिनियम १९३४ च्या विनियम ७ अनुसार व अनुसूचित बँकेचे विनियम, १९५१ अन्वये, बँकांनी, मार्च ३१ व सप्टेंबर ३० रोजीचे व्यवहार बंद झाल्यानंतर त्यांच्या बचत खात्यातील ठेवींचे प्रमाण, डिमांड अँड टाईम लायाबिलिटीजमध्ये रुपांतरित करुन, ते जोडपत्र २ मध्ये दिलेल्या विहित नमुन्यात पाठवावेत.

(४) पारक्षिक अहवालांमध्ये कळविलेल्या निधींचे स्त्रोत व उपयोग ह्यात मोठे फरक/बदल (व्हॅरिएशन्स) असल्यास व ते २०% पेक्षा जास्त असल्यास, संबंधित बँकांनी अहवालांमधील अशा मोठ्या फरकांबाबतची कारणे द्यावीत.

(५) अनुसूचित बँका विनियमच्या विनियम ५ (१)(क) अनुसार, त्या बँकेच्या वतीने, आरबीआय अधिनियम, १९३४ च्या कलम ४२(२) खाली विहित केलेल्या अहवालांवर सही करण्यास प्राधिकृत असलेल्या अधिका-यांची नावे, हुद्दे व त्यांच्या नमुना-सह्या सादर करणे आवश्यक आहे. ह्यापैकी केवळ दोनच प्राधिकृत अधिका-यांच्या सह्या असाव्यात. ह्यामध्ये बदल झाल्यास बँकांनी त्यांची नवीन यादी रिझर्व बँकेला सादर करावी.

**(३.१५) अहवाल पाठविण्यास विलंब झाल्यास/न पाठविल्यास दंड**

अहवाल पाठविण्यास विलंब झाल्यास किंवा तो न पाठविल्यास आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४२(४) च्या तरतुदी लागु होतील व बँकांना त्यात दिलेले दंड लागु होतील.

(अ) जून २४, २००६ पासून सुरु होणा-या पंधरवड्यापासून, सीआरआर न ठेवला जाण्याबाबतचे दंडात्मक व्याज पुढीलप्रमाणे आकारले जाईल.

(१) दैनंदिन धर्तीवर सीआरआर न ठेवला गेल्यास (जो एकूण सीआरआर आवश्यकतेनुसार ७०% आहे) त्या दिवसासाठीचे दंडात्मक व्याज हे, प्रत्यक्ष ठेवलेली रक्कम, त्या दिवसासाठी विहित केलेल्या किमान रकमेपेक्षा जेवढ्याने कमी आहे त्या रकमेवर बँक दरापेक्षा दरसाल तीन टक्के अधिक एवढी वसुल केली जाईल व ही तूट पुढील दिवसांसाठीही सुरुच राहिल्यास, दंडात्मक व्याज हे, बँक दराच्या दरसाल पाच टक्के अधिक दराने वसूल केले जाईल.

(२) एखाद्या पंधरवड्यामध्ये सरासरी धर्तीवर सीआरआर न ठेवला गेल्यास, आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४२ च्या पोट कलम (३) मध्ये दिलेल्या दराने दंडात्मक व्याज वसूल केले जाईल.

(ब) आरबीआय अधिनियम, १९३४ च्या कलम ४२(३) च्या तरतुदींखाली, बँक दरापेक्षा दरसाल पाच टक्के अधिक दराने दंडात्मक दराने देय असेल तेव्हा

(१) अशी कसुरी जाणूनबुजून व मुद्दाम करणा-या, त्या अनुसूचित बँकेच्या प्रत्येक संचालकाला, व्यवस्थापकाला किंवा सचिवाला पाचशे रुपयांपर्यंत दंड केला जाईल व तो दंड ती कसुरी करणे सुरुच राहिल्यास त्यानंतरच्या प्रत्येक पंधरवड्यासाठी अतिरिक्त पाचशे रुपये असेल.

(२) वरील पंधरवड्यानंतर, रिझर्व बँक, त्या अनुसूचित बँकेला कोणतीही नवीन ठेव स्वीकारण्याची मनाई करु शकते आणि ह्या कलमातील मनाईचे पालन करण्यात त्या बँकेने कसुरी केल्यास, अशी कसुरी करण्यात जाणुनबुजुन व मुद्दाम भाग घेणारा किंवा निष्काळजीपणामुळे किंवा अन्य प्रकारे अशी कसुरी करण्यास साह्य करणारा बँकेचा प्रत्येक संचालक व अधिकारी प्रत्येक कसुरीच्या बाबतीत पाचशे रुपयांपर्यंतच्या दंडास पात्र ठरेल आणि त्या अनुसूचित बँकेने ह्या मनाईचा भंग करुन ठेव स्वीकारल्याच्या प्रथम दिवसापासून पुढील प्रत्येक दिवसासाठी पाचशे रुपये एवढा दंड आकारला जाईल.

**(४) अनुसूचित युसीबींसाठी रोख राखीव निधी**

बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम १८ अन्वये, प्रत्येक युसीबीने (अनुसूचित बँक नसलेल्या) दैनंदिन धर्तीवर, एक रोख राखीव निधी ठेवणे आवश्यक आहे आणि तो मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी काढलेल्या तिच्या डीटीएलच्या ३% पेक्षा कमी नसावा आणि प्रत्येक महिन्याच्या पंधराव्या दिवसाच्या आत, महिन्यामध्ये, एकाआडच्या शुक्रवारी, (भारतामधील डीटीएलच्या माहितीसह) तसेच अशा एखाद्या शुक्रवारी, पराक्रम्य संलेख अधिनियम १८८१ अन्वये सार्वजनिक सुट्टी असल्यास आदल्या दिवशी व्यवहार बंद झाल्यावरचा, अशा प्रकारे ठेवलेल्या रकमेचा तपशील असलेला अहवाल रिझर्व बँकेला सादर करावा. ही शिल्लक, स्वतःजवळील रोख रकमेचे स्त्रोत किंवा रिझर्व बँक, किंवा राज्य सहकारी बँक येथील चालुखात्यातील किंवा निव्वळ शिल्लक किंवा संबंधित जिल्ह्याची केंद्रीय सहकारी बँकेतील शिल्लक किंवा एका किंवा अधिक प्रकाराने ठेवता येईल. सहकारी बँकेच्या संदर्भातील चालु खात्यांमधील निव्वळ शिल्लक म्हणजे, त्या विशिष्ट बँकेने, अशा सहकारी बँकेत ठेवलेल्या चालु खात्यांमधील क्रेडिट बॅलन्सेच्या एकूण रकमेच्या अतिरिक्त असलेली, त्या सहकारी बँकेने, भारतीय स्टेट बँक किंवा दुय्यम बँक किंवा संगत (कॉरेस्पाँडिंग) बँकेत ठेवलेल्या चालु खात्यातील अतिरिक्त रक्कम, जानेवारी २९, २००९ पासून, पुढील आदेश दिले जाईपर्यंत, युसीबींना, त्यांनी आयडीबीआय बँक लि. मध्ये चालु खात्यात ठेवलेल्या रकमेपर्यंत, बीआर अधिनियम १९४९ (एएसीएस) च्या कलम १८ खाली सीआरआर ठेवला जाण्याबाबत सूट देण्यात आली आहे.

## (४.१) सीआरआरसाठी एनडीटीएल काढणे

डीटीएल काढणे, बँकिंग प्रणालीबाबतची दायित्व, बँकिंग प्रणाली संबंधीचे ॲसेट्स व एनडीटीएल इत्यादि काढण्याबाबतचा तपशील जोडपत्र ३ मध्ये दिला आहे.

## (४.२) अहवालांच्या आवश्यकता

अनुसूचित नसलेल्या बँकांनी, जोडपत्र ४ मध्ये दिलेल्या नमुन्यात, फॉर्म आय मध्ये, रिझर्व बँकेच्या संबंधित कार्यालयाकडे, अहवालाशी संबंधित महिन्याच्या समाप्तीपासून २० दिवसांच्या आत एक अहवाल सादर करणे आवश्यक असून त्यात, त्या महिन्यातील एकाआड येणा-या प्रत्येक शुक्रवारी, व्यवहार बंद झाल्यावर, अशा शुक्रवारी तिच्या भारतातील डीटीएलसह, इतर बाबींसह, बीआर अधिनियम १९४९ खाली, त्या बँकेने ठेवलेल्या रोख-राखीव निधीची स्थिती दर्शविली जावी. पराक्रम्य संलेख अधिनियम १८८१ खाली अशा शुक्रवारी सार्वजनिक रजा असल्यास, त्याच्या आदल्या कामाच्या दिवशी, व्यवहार बंद होतेवेळीची स्थिती दिली जावी. अनुसूचित नसलेल्या बँकांनी, जोडपत्र ५ मध्ये दिलेल्या नमुन्यात, जोडपत्र २ आय मध्ये, फॉर्म आय मधील अहवालासह पुढील बाबींची स्थिती सादर करणे आवश्यक आहे.

(अ) बीआर अधिनियम, १९४९ च्या कलम १८ खाली ठेवणे आवश्यक असलेला रोख राखीव निधी

(ब) प्रत्यक्षात ठेवलेला रोख राखीव निधी

(क) महिन्यातील प्रत्येक दिवसासाठी तूट/अतिरिक्त

## (४.३) दंड

अनुसूचित नसलेल्या बँकांनी, आवश्यक असलेला रोख राखीव निधी ठेवला असल्याची खात्री करुन घ्यावी आणि वैधानिक कालावधीत, विहित अहवाल परिशिष्ट आय (जोडपत्र ५) सह संबंधित प्रादेशिक कार्यालयांना सादर करावा. विहित कालावधीत अहवाल सादर न केला गेल्यास बीआर अधिनियम १९४९ च्या कलम ४६(४) च्या तरतुदी लागु होतील व त्यात दिलेला दंड बँकांना लावला जाईल. ह्यासाठी, बँकांनी त्यांच्याच हितासाठी, वरील बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम १८ च्या अटींचे पालन केले गेले असल्याची खात्री करुन घ्यावी.

## (५) वैधानिक लिक्विडिटी रिझर्वज (अनुसूचित व अननुसूचित युसीबी)

बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम २४(१) व कलम (२अ)(अ) अन्वये, प्रत्येक बँकेने (अनुसूचित व अननुसूचित) दैनंदिन धर्तीवर लिक्विड ॲसेट्स ठेवणे आवश्यक आहे आणि त्याची रक्कम, मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी तिच्या भारतामधील डीटीएलच्या २५ टक्क्यांपेक्षा कमी किंवा रिझर्व बँकेने अधिसूचित केल्यानुसार ४० टक्क्यांपेक्षा जास्त नसलेली) असणार नाही.

## (५.१) विद्यमान एसएलआर

सध्या युसीबींनी, त्यांच्या भारतामधील एकूण डीटीएलवर २५% एवढा एकसमान एसएलआर ठेवणे आवश्यक आहे.

## (५.२) एसएलआर काढणे

बँका/रिझर्व बँकेला दैनंदिन विवरणपत्रे पाठविण्याचे अनुपालन हे, दाखल (लॉज) केलेल्या/उपयोग केलेल्या सिक्युरिटीज सूचिबध्द करुन बँका/रिझर्व बँक ह्यांना दैनंदिन विवरणपत्रे पाठविण्याचे अनुपालन दायित्वावर सर्वसाधारणपणे, फॉर्म मध्ये दाखविलेल्या अहवालानुसार, एका आडच्या संबंधित शुक्रवारी एसएलआरची स्थिती संबंधाने देखरेख ठेवता येते.

सीबीएलओमार्फत घेतलेल्या कर्जावर एसएलआर ठेवणेही बँकांसाठी आवश्यक आहे. तथापि, कोणत्याही दिवशीच्या अखेरीस कॉंस्टिट्युअंटसबसिडियरी जनरल खाते (सीएसजीएल) सुविधांखाली, क्लियरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (सीसीआयएल) मध्ये, बँकेच्या गिल्ट अकाऊंटमध्ये दाखल (लॉज) केलेल्या सिक्युरिटीज भारमुक्त (अनएंकबर्ड) असल्यास, त्या संबंधित बँकेद्वारा एसएलआरसाठी धरल्या जाऊ शकतात. ह्यासाठी, सीसीआयएल, बँका/रिझर्व बँकेला, लॉज घेतलेल्या/वापरलेल्या/भारमुक्त राहिलेल्या सिक्युरिटीज सूचिबध्द करुन दैनंदिन विवरणपत्र देऊ करील.

एसएलआर काढण्याबाबतचा तपशील जोडपत्र ३ मध्ये दिला आहे.

**(५.३) स्टॅट्युटरी लिक्विडिटी रिझर्वज ठेवण्याची रीत**

लिक्विड ॲसेट्स पुढीलप्रमाणे ठेवता येतील

(१) रोख स्वरुपात किंवा

(२) विद्यमान बाजारभावापेक्षा जास्त नसलेल्या भावाने किंमत केलेल्या सोन्याच्या स्वरुपात किंवा

(३) भार/बोजा नसलेल्या मंजुरीप्राप्त सिक्युरिटींमध्ये (ह्यांची किंमत अशा सिक्युरिटींच्या संबंधित असेल) किंवा मूल्यांकनाच्या रीतीच्या संयोगाने (म्हणजे, कॉस्ट प्राईस, मार्केट मूल्य, पुस्तकी मूल्य किंवा दर्शनी मूल्य - आरबीआयने वेळोवेळी विहित केल्यानुसार)

(परिपत्रक क्र. आयडीएमडी.३४२६/११.०१.०१/(डी) २२५-०६ दि. मार्च ०३, २००६ अनुसार, निगोशिएटेड डीलिंग सिस्टिम-ऑर्डर मॅचिंग (एनडीएस - ओएम) च्या सर्व प्रभाग - सभासदांना, एनडीएस - ओएम प्लॅटफॉर्मवर व्हेन इश्युड ट्रॅझॅक्शन्स करण्यास परवानगी देण्यात आली होती. व्हेन इश्युड मार्केटमध्ये विकत घेतलेल्या सिक्युरिटीज, केवळ डिलिव्हरी दिल्यावरच एसएलआरसाठी पात्र ठरतील)

पुढील बाबी भारतात कॅश मेंटेंड म्हणून समजल्या जातील

(१) सीआरआर आवश्यकतेपेक्षा अतिरिक्त अशी, युसीबीने रिझर्व बँकेत ठेवलेली शिल्लक

(२) एखाद्या सहकारी बँकेने स्वतःजवळ किंवा संबंधित राज्याच्या राज्य सहकारी बँकेमध्ये किंवा चालु खात्यांमध्ये निव्वळ शिलकेच्या स्वरुपात ठेवलेली रोकड किंवा शिल्लक आणि बीआर अधिनियम, १९४९ च्या कलम १८ खाली ठेवणे आवश्यक असलेल्या शिल्लकीच्या अतिरिक्त, संबंधित जिल्ह्याच्या केंद्रीय सहकारी बँकेत ठेवलेली कोणतीही शिल्लक

(३) चालु खात्यामधील कोणतीही निव्वळ शिल्लक

ह्याशिवाय, परिपत्रक युबीडी.बीपीडी.(पीसीबी).सीआयआर.क्र. ४१/१२.०५.००१/२००८ दि. जानेवारी २९, २००९ (डिसेंबर १५, २००८ च्या अधिसूचनेसह वाचित) अन्वये, प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना, पुढील आदेश दिले जाईपर्यंत, त्यांनी आयडीबीआय बँक लि. मधील चालु खात्यात ठेवलेल्या रकमांपर्यंत सीआरआर ठेवण्यापासून किंवा बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ च्या कलम ५६ सह वाचित कलम २४ खाली, रोकड, सोने किंवा भाररहित मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजच्या स्वरुपात ॲसेट ठेवण्यापासून सूट देण्यात आली आहे.

टीप - संबंधित राज्य/जिल्हा ह्यांच्या राज्य/जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेमधील भाररहित (अनएंकंवर्ड) ठेवी.

(अ) जेव्हा एखाद्या जिल्ह्यात एकापेक्षा अधिक केंद्रीय सहकारी बँका सेवा देतात तेव्हा संबंधित केंद्रीय सहकारी बँकेच्या पोटकलमातील तरतुदींनुसार, प्रत्येक केंद्रीय सहकारी बँकेचे कार्यकारी क्षेत्र हे स्पष्ट व वेगळे असते. त्या जिल्ह्यातील संबंधित केंद्रीय सहकारी बँकेच्या क्षेत्रात कार्यकारी असलेल्या प्राथमिक सहकारी बँका, त्या केंद्रीय सहकारी बँकेशी संगत/संलग्न असतील. ह्यासाठी, बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम १८ व २४ साठी, जिल्ह्यातील ज्या केंद्रीय सहकारी बँकांशी, प्राथमिक सहकारी बँका संलग्न असतील किंवा त्या प्राथमिक सहकारी बँकेचे पंजीकृत कार्यालय जिच्या कार्यकारी क्षेत्रात येते तीच त्या जिल्ह्यासाठी केंद्रीय सहकारी बँक समजली जावी.

(ब) जेथे एखादी प्राथमिक सहकारी बँक, अशा क्षेत्राच्याही बाहेरील त्या जिल्ह्यातील इतर केंद्रीय सहकारी बँका सेवा देत असलेल्या क्षेत्रांमध्ये शाखा उघडून कार्यकारी असेल, तेथे तिने अशा केंद्रीय सहकारी बँकेत ठेवलेल्या शिल्लकी रोख राखीव निधी किंवा लिक्विड ॲसेट्स (असेल त्याप्रमाणे) समजल्या जाव्यात

(कायदेशीरपणे सांगावयाचे झाल्यास, लिक्विड ॲसेट्स ठेवण्यासाठी बँका सोन्यामध्ये (सुवर्ण अलंकारांसह) गुंतवणुक करु शकतात. तथापि अशा गुंतवणुकी अनुत्पादक स्वरुपाच्या आहेत आणि भाववाढ सोडल्यास त्यातून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. हे मुद्दे व मूल्यांकन, सुरक्षा इत्यादींमधील अडचणींचा विचार करता, बँकांनी एसएलआरसाठी लिक्विड ॲसेट्स ठेवण्यासाठी सोन्यामध्ये गुंतवणुक करु नये)

**(५.४) मंजुरीप्राप्त सिक्युरिटींबाबत स्पष्टीकरणे/आवश्यकता**

(१) बीआर अधिनियम १९४९ च्या कलम ५ (अ) अनुसार, बीआर अधिनियम १९४९ च्या कलम २४ साठी, मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज म्हणजे, इंडियन ट्रस्ट्स अधिनियम १८८२ च्या कलम २० च्या खंड (अ),(ब),(बब),(क) किंवा (ड) खाली एखादा ट्रस्टी पैसा गुंतवू शकेल अशी सिक्युरिटी.

(टीप - इंडियन ट्रस्ट्स अधिनियम, १८८२ च्या कलम २० खाली, सर्वच सिक्युरिटीज्, बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम २४ साठी, मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज समजल्या जाऊ शकत नाही. मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज् ह्या अशा ट्रस्टी सिक्युरिटीज् असाव्यात की ज्या रिझर्व बँकेद्वारा त्याच जागी (इविड) कलम २४ साठी पात्र असलेल्या सिक्युरिटीज म्हणून विहित करण्यात आल्या आहेत. भारत सरकार आणि राज्य सरकारांनी दिलेल्या सिक्युरिटीज्चा एसएलआर-दर्जा, त्या सिक्युरिटीज् दिल्या जातेवेळी रिझर्व बँकेने प्रसृत केलेल्या प्रेस रिलीजमध्ये निर्देशित केला जाईल. एसएलआर सिक्युरिटीजची अद्यावत व विद्यमान यादी रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरील (www.rbi.org.in) डेटाबेस ऑन इंडियन इकॉनॉमी ह्या लिंकखाली दिली आहे. कलम २४ साठी, एखाद्या सिक्युरिटीजच्या वर्गीकरणाबाबत एखादी शंका उद्‌भवल्यास, बँका, रिझर्व बँकेकडून स्पष्टीकरण मागवू शकतात)

(३) बँका, त्यांच्या राखीव निधीची स्थिर ठेवींमधील गुंतवणुकी किंवा मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजमधील (त्या भाररहित असल्यास) गुंतवणुकी, एसएलआर ॲसेट्स म्हणून धरु शकतात

(४) भाररहित मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजमध्ये, अग्रिम राशी मिळविण्यासाठी किंवा अन्य प्रकारच्या कर्ज व्यवस्थेसाठी (अशा सिक्युरिटीज विरुध्द न घेतलेल्या किंवा न मिळविलेल्या रकमेपर्यंत) दुस-या संस्थेमध्ये ठेवलेल्या भाररहित मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजचा समावेश आहे.

### (५.५) सरकारी सिक्युरिटीजमधील किमान एसएलआर होल्डिंग

(१) परिपत्रक युबीडी.क्र.बीआर.सीआयआर.४२/१६.२६.००/२०००-०१ दि. एप्रिल १९, २००१ अन्वये, युसीबी, खाली दिल्यानुसार सरकारी व इतर मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजमध्ये गुंतवणुक करु शकतील असे ठरविण्यात आले होते

| अनुक्रमांक | बँकांचा वर्ग | सरकारी व इतर मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजमधील एनडीटीएलची टक्केवारी म्हणून किमान एसएलआर होल्डिंग |
|---|---|---|
| १ | **अनुसूचित बँका** | २५ % |
| २ | **अननुसूचित बँका**<br>(अ) रु. २५ कोटी व अधिक एनडीटीएल - | १५ % |
| | (ब) रु. २५ कोटी पेक्षा कमी | १०% |

(२) परिपत्रक युबीडी (पीसीबी).सीओ.बीपीडी.सीआयआर.क्र.२८/१६.२६.००/२००८-०९ दि. नोव्हेंबर २६, २००८ अन्वये, सरकारी सिक्युरिटीजच्या स्वरुपातील एसएलआर होल्डिंग्जचे एनडीटीएल म्हणूनचे प्रमाण पुढीलप्रमाणे वाढविण्याचे ठरविण्यात आले आहे

(अ) अननुसूचित टायर १ बँका, सप्टेंबर ३०, २००९ पर्यंत त्यांच्या एनडीटीएलच्या ७.५ टक्क्यांपेक्षा कमी नसलेला एसएलआर, मार्च ३१, २०१० पर्यंत १५% पर्यंत असलेला एसएलआर, सरकारी व इतर मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजच्या स्वरुपात ठेवतील

(ब) अननुसूचित टायर २ बँकांबाबत, त्यांच्या एनडीटीएलच्या १५% पेक्षा कमी नसलेला सरकारी व इतर मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजमधील एसएलआर धारण करण्याबाबतचे सूत्र मार्च ३१, २०१० पर्यंत सुरु राहील

(क) मार्च ३१, २०११ पासून, सर्व अननुसूचित युसीबींनी, सरकारी व इतर मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजमधील एसएलआर, त्यांच्या एनडीटीएलच्या २५% पर्यंत ठेवणे आवश्यक आहे.

(३) टायर १ बँकांची व्याख्या मार्च ०७, २००८ च्या परिपत्रकानुसार पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आली आहे

टायर १ प्राथमिक (नागरी) सहकारी बँक म्हणजे

(अ) युनिट बँका - म्हणजे, केवळ एकच शाखा/मुख्य कार्यालय असलेल्या बँका आणि केवळ एकाच जिल्ह्यात शाखा असलेल्या, रु. १०० कोटीच्या खाली ठेवी असलेल्या बँका

(ब) रु. १०० कोटीपेक्षा कमी ठेवी असलेल्या व एकापेक्षा अधिक जिल्ह्यात शाखा असलेल्या बँका - मात्र अशा शाखा संलग्न असलेल्या जिल्ह्यांमध्ये असाव्यात **आणि** एका जिल्ह्यातील शाखांमधील अग्रिम राशी, त्या बँकेच्या अनुक्रमे एकूण ठेवी व अग्रिम राशींच्या किमान ९५% *वेगवेगळ्या* असलेल्या बँका

(क) रु. १०० कोटींपेक्षा कमी ठेवी असलेल्या व ज्यांच्या शाखा सुरुवातीला एकाच जिल्ह्यात होत्या परंतु त्यानंतर त्या जिल्ह्याचे पुनर्संघटन झाल्याने बहु-जिल्हा झालेल्या बँका

(४) कलम २४ अ खाली, मार्च ३१, २००८ पर्यंत सूट युसीबींना सरकारी सिक्युरिटीजमध्ये गुंतवणुक करण्यास येत असलेल्या अडचणी विचारात घेऊन, युसीबींच्या एका वर्गाला आवश्यकतांच्या बाबतीत सीमित सूट देता येईल असे ठरविण्यात आले. त्यानुसार, परिपत्रक युबीडी (पीसीबी).सीआयआर.क्र.३१/१६.२६.००/२००५-०६ दि. फेब्रुवारी १७, २००६ अन्वये, राजपत्रामधील दि. डिसेंबर २६, २००५ च्या अधिसूचनेने, टायर-१ बँका म्हणून वर्गीकृत झालेल्या अननुसूचित युसीबींनी, व्याजधारक ठेवींमध्ये, आवश्यक ती रक्कम, भारतीय स्टेट बँक, व तिच्या दुय्यम बँका, आणि इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया लि. (हे नाव आयडीबीआय बँक लि. असे बदलण्यात आले) सह सार्वजनिक क्षेत्रातील बँका ह्यामध्ये ठेवल्यास, त्यांच्या डीटीएलच्या १५% पर्यंत, विहित केलेल्या ॲसेट्समध्ये एसएलआर ठेवण्यापासून सूट देण्यात आली. वरील प्रकारच्या वर्गातील युसीबींना ही सूट फेब्रुवारी १७, २००६ पासून उपलब्ध होती व ती मार्च ३१, २००८ पर्यंत जारी होती. त्यानंतर, परिपत्रक युबीडी (पीसीबी).सीआयआर.क्र.३७/१६.२६.००/२००८-०९ दि. जानेवारी २१, २००९ (२६ नोव्हेंबर २००८ च्या अधिसूचनेसह वाचित) अन्वये, ही सूट मात्र, ऑक्टोबर १, २००९ पासून अशी सूट एनडीटीएलच्या ७.५ टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही. एप्रिल १, २०१० पासून ही सूट काढून टाकली जाईल.

(५) सर्व युसीबींनी, त्यांच्या सरकारी सिक्युरिटीजमधील गुंतवणुकी, केवळ रिझर्व बँकेच्या सबसिडिअरी लेजर खात्यात (एसजीएल) किंवा अनुसूचित वाणिज्य बँका, प्राथमिक डीलर्स (पीडी), राज्य सहकारी बँका आणि स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (एसएचसीआयएल) ह्यामधील सीएसजीएल खात्यात किंवा नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज् लि, (एनएसडीएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लि. (सीडीएसएल) आणि नॅशनल सिक्युरिटीज क्लियरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (एनएससीसीएल) मधील डिमॅट खात्यामध्येच करणे आवश्यक आहे.

**(५.६) एसएलआरसाठी सिक्युरिटीजचे वर्गीकरण व मूल्यांकन**

(१) एसएलआरसाठी सिक्युरिटीजचे वर्गीकरण व मूल्यांकन रिझर्व बँकेने वेळोवेळी विहित केल्यानुसार केले जाईल. एसएलआरसाठी सिक्युरिटीजचे वर्गीकरण व मूल्यांकन बाबतच्या सविस्तर सूचनांसाठी, महापरिपत्रक क्र.युबीडी.बीपीडी.एमसी.क्र.१२/१६.२०.०००/२००९-१० दि. जुलै १, २०१० चा संदर्भ घ्यावा

(२) माहिती कळविण्यासाठीचा नमुना जोडपत्र ६ मध्ये दिला आहे. २००३ पासून, ह्या नमुन्यानुसारची माहिती, अहवालाचे जोडपत्र म्हणून फॉर्म १ मध्ये, ह्या विभागाच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडेच पाठविली जावी. ह्या अहवालामध्ये संबंधित महिन्यामधील पुढील पंधरवड्यांची माहिती असावी.

(५.७) एसएलआरसाठी एनडीटीएल काढणे

(१) बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम १८(१) च्या स्पष्टीकरणामधील खंड (ड) खाली काढलेल्या बँकिंग सिस्टिम बाबतच्या निव्वळ जबाबदा-यांना (लायाबिलिटीज) एसएलआर ठेवण्याबाबत सूट दिली आहे.

(२) एसएलआरसाठी निव्वळ आंतर-बँकीय जबाबदा-या काढण्याची रीत, बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम १८(१) च्या स्पष्टीकरणामधील खंड (ड)अनुसार असावी. एसएलआरसाठी एकूण एनडीटीएल व बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम २४(१) खालील किमान २५% एसएलआर काढण्याची रीत, जोडपत्र ३ मध्ये, सीआरआर काढण्याच्या रीतीप्रमाणेच असावी.

(३) बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम १८(१) च्या स्पष्टीकरणामधील खंड (ड)च्या अनुसार, निव्वळ आंतर-बँकीय जबाबदा-यांची रक्कम काढण्यासाठी, लायाबिलिटीज टु दि बँकिंग सिस्टिम च्या रकमेमधून ॲसेट्स विथ बँकिंग सिस्टिम ची रक्कम वजा करावी. ती धन संख्या असल्यास, एकूण एनडीटीएल

काढण्यासाठी ती लायाबिलिटीज टु अदर्स मध्ये मिळवावी. ती ऋण संख्या असल्यास, निव्वळ आंतर-बँकीय जबाबदा-या शून्य असल्याचे समजले जाईल आणि लायाबिलिटीज टु अदर्स हाच एकूण एनडीटीएल समजला जाईल. लायाबिलिटीज काढण्यासाठी, (ह्या कायद्याखाली किमान विहित एसएलआर धरुन), निव्वळ आंतर-बँकीय जबाबदा-या ही धन संख्या असल्यास, ती एकूण एनडीटीएलमधून वजा केली जावी. तथापि, एकूण एनडीटीएलवरील किमान २५% एसएलआर काढण्यासाठी, त्यात निव्वळ आंतर-बँकीय जबाबदा-यांचाही समावेश केला जावा.

(४) डीटीएल, बँकिंग सिस्टिम संबंधीच्या जबाबदा-या, बँकिंग सिस्टिमबाबतचे ॲसेट्स आणि एनडीटीएल इत्यादि काढण्याबाबत जोडपत्र ३ मध्ये स्पष्टीकरण दिलेले आहे.

(५) युसीबीने जेथे ठेवी ठेवल्या आहेत अशा डीसीसीबी/एससीबी कडून कर्ज घेतले असल्यास, एसएलआर काढण्यासाठी, घेतलेल्या कर्जाची रक्कम त्या ठेवीमधून वजा केली जावी - मग अशा ठेवींवरील लिएन मार्क केलेले असो किंवा नसो. कारण, कसुरी झाल्यास धनको/कर्जदायी बँक त्या लिएनबाबत अंमलबजावणी करु शकते आणि ठेवलेल्या ठेवी लिक्विडिटी - आवश्यकतांसाठी पुरेशा असतीलच असे नाही. सेलरी अर्नर्स सहकारी बँकांच्या बाबतीत, ह्या सूचनांचे पालन करण्यासाठी, मार्च ३१, २००९ पर्यंत वेळ देण्यात आला होता (परिपत्रक युबीडी.सीओ.बीपीडी.(पीसीबी).क्र.२०/१२.०५.००१/२००८-०९ दि. सप्टेंबर ३०, २००८ अन्वये)

**(५.८) अहवालांच्या आवश्यकता**

(१) बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम २४ खाली, सर्व युसीबींनी (अनुसूचित व अननुसूचित), त्या महिन्यातील प्रत्येक एका आडच्या शुक्रवारी व्यवहार समाप्तीचे वेळी, ह्या कलमाखाली ठेवलेल्या लिक्विड ॲसेट्सची स्थिती दर्शविणारा अहवाल फॉर्म १ मध्ये (जोडपत्र ४) दरमहा सादर करणे आवश्यक आहे

(टीप - अननुसूचित युसीबींच्या बाबतीत, रोख राखीव निधी व वैधानिक लिक्विड ॲसेट्स ह्या दोन्हीही साठी फॉर्म १ मध्येच अहवाल पाठवावयाचा आहे)

(२) सर्व युसीबींनी (अनुसूचित तसेच अननुसूचित) जोडपत्र ७ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार, फॉर्म १ मधील रिटर्नसह, पुढील बाबींची स्थिती दर्शविणारे, परिशिष्ट २ देणे आवश्यक आहे

(अ) बीआर अधिनियम (एएसीएस) १९४९ च्या कलम २४ खाली ठेवणे आवश्यक असलेले लिक्विड ॲसेट्स

(ब) प्रत्यक्षात ठेवलेले लिक्विड ॲसेट्स

(क) महिन्याच्या प्रत्येक दिवसासाठी तूट/अतिरिक्त

**(५.९) दंडात्मक तरतुदी**

(१) बीआर अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम २४(४)(अ) अन्वये, कोणत्याही एकाआडच्या शुक्रवारी (किंवा अशा शुक्रवारी सार्वजनिक रजा असल्यास त्याच्या आदल्या दिवशी) व्यवहार बंद होतेवेळी कोणत्याही बँकेने ठेवलेली रक्कम, विहित केलेल्या किमान रकमेपेक्षा किंवा खंड २४ (२अ)(अ) खाली, कमी असल्यास, ती बँक, त्या दिवसाच्या कसुरीसाठी, रिझर्व बँकेला, प्रत्यक्षात ठेवलेली रक्कम विहित केलेल्या रकमेपेक्षा जेवढ्याने कमी असेल, त्या रकमेवर, त्या दिवसासाठी, बँक दरापेक्षा द.सा. ३% दराने दंडात्मक व्याज देण्यास पात्र ठरेल.

(२) ह्याशिवाय, कलम २४(४)(ब) अन्वये, पुढील एकाआडच्या शुक्रवारीही (किंवा त्या शुक्रवारी सार्वजनिक रजा असल्यास त्याच्या आदल्या दिवशी) अशीच कसुरी झाल्यास व पुढील एकाआडच्या शुक्रवारीही (किंवा आदल्या कामाच्या दिवशी) ती घडणे सुरुच राहिल्यास (जसे असेल तसे) ते दंडात्मक व्याज, त्या एकाआडच्या शुक्रवारी व त्यानंतरच्या कसुरीच्या प्रत्येक एकाआडच्या शुक्रवारसाठी (किंवा आदल्या कामाच्या दिवसासाठी) बँक दरापेक्षा द.सा. ५% वाढविले जाईल.

(३) कलम २४(४) च्या तरतुदींचा अवमान न करता, कोणत्याही बँकेने, कलम २४(२अ) च्या खंड (अ) खाली किंवा ठेवणे आवश्यक असलेली रक्कम न ठेवल्यास, रिझर्व बँक, कलम २४(५)(अ) खाली, अशा प्रत्येक कसुरीसाठी, कलम २४(४)(अ) मध्ये दिल्यानुसार, संबंधित बँकेला, त्या दिवसासाठी दंडात्मक व्याज देण्यास सांगू शकते आणि ही कसुरी पुढील कामाच्या दिवशीही सुरु राहिल्यास कसुरीच्या संबंधित दिवसांसाठी हे दंडात्मक व्याज, कलम २४(४)(ब) अन्वये वाढवू शकते.

(४) कलम २४(६)(अ) च्या तरतुदींनुसार, कलम (४) व (५) खाली द्यावयाचा दंड, रिझर्व बँकेने त्याबाबत पाठविलेल्या नोटिशीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत बँकांनी भरावयाचा आहे.

(५) आवश्यक तो एसएलआर ठेवण्यात आला असल्याची खात्री न चुकता करुन घ्यावी आणि परिशिष्ट २ (जोडपत्र ८) सह विहित केलेला अहवाल, विहित कालावधीत, संबंधित प्रादेशिक कार्यालयांकडे पाठवावा. वेळेवारी अहवाल सादर न केला गेल्यास, ह्या अधिनियमाच्या कलम ४६(४) च्या तरतुदी लागु होतील व त्या बँकां, त्यामध्ये दिलेल्या दंडासाठी पात्र ठरतील.

(६) वारंवार सूचना व इशारे देऊनही जेथे बँका सतत कसुरी करत असल्याचे आढळल्यास, अशी कसुरी करणा-या बँकांवर दंड लावण्याव्यतिरिक्त, परवानाप्राप्त बँकांचे परवाने रद्द करणे आणि परवाने नसलेल्या बँकांना परवाना देणे नाकारणे अशी कारवाई, रिझर्व बँक, ह्या अधिनियमाच्या कलम २२ खाली करु शकते. ह्यासाठी बँकांनी त्यांच्याच हितासाठी, विहित केलेला लिक्विडिटी रेशो ठेवला जात असल्याची खात्री करुन घ्यावी आणि फॉर्म १, फॉर्म ९ व फॉर्म ब मध्ये, रिझर्व बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडे सादर करावयाचे अहवाल त्वरित पाठवावेत.

### (५.१०) इतर दंडात्मक तरतुदी

(१) विहित दराने सीआरआर व एसएलआर ठेवण्याव्यतिरिक्त, बँकांनी, रिझर्व बँकेच्या संबंधित कार्यालयाकडे वैधानिक अहवाल पाठविणे आवश्यक आहे. ह्या वैधानिक आवश्यकतांचा भंग केला गेल्यास, दंडात्मक व्याज आकारण्याव्यतिरिक्त, बीआर अधिनियम १९४९ (एएसीएस) च्या कलम ५६ सह वाचित, कलम ४६(४) मध्ये दिलेले दंडही लावले जाऊ शकतात.

(२) कोणत्याही बँकेने कॅश रिझर्व/लिक्विड ॲसेट्स बाबतची पुरेशी रक्कम ठेवलेली नसल्यास, तिने, अहवालाच्या सोबत पत्र जोडून त्यात अशा त्रुटी/कसुरी बाबतची कारणे स्पष्ट करावीत.

**जोडपत्र १**

**महापरिपत्रक**

**<u>कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर)</u>**

**<u>सीआरआरसाठी डिमांड व टाईम लायाबिलिटीज काढणे</u>**

**(अनुसूचित प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना लागु)**

**[परिच्छेद ३.७(२) अन्वये]**

**(१) निरनिराळ्या संज्ञांच्या व्याख्या**

(बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ५६ सह वाचित कलम १८(१) च्या स्पष्टीकरणानुसार)

(१) सरासरी दैनिक शिल्लक - म्हणजे, एखाद्या पंधरवड्याच्या प्रत्येक दिवशी, व्यवहार समाप्त होतेवेळी असलेल्या शिल्लकांची सरासरी.

(२) पंधरवडा म्हणजे शनिवार ते पुढील दुसरा शुक्रवारपर्यंतचा (दोन्हीही दिवस धरुन) कालावधी

**(२) बँकिंग सिस्टिम मध्ये पुढील बाबी येतात**

(१) भारतीय स्टेट बँक

(२) भारतीय स्टेट बँकेच्या दुय्यम बँका

(३) राष्ट्रीयीकृत बँका

(४) प्रादेशिक ग्रामीण बँका

(५) बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ च्या कलम ५ च्या खंड (क) मध्ये व्याख्या केलेल्या बँकिंग कंपन्या, ह्यामध्ये पुढील समाविष्ट आहेत

* खाजगी क्षेत्रातील बँका

* विदेशी बँका,

**[टीप** - भारतात कोणतीही शाखा नसलेल्या विदेशी बँका ह्या बँकिंग सिस्टिम चा कोणताही भाग नाहीत ]

**[टीप** - सहकारी भू-तारण/विकास बँका ह्या बँकिंग सिस्टिम चा भाग नाहीत. **]**

(६) ह्याबाबत केंद्र सरकारने अधिसूचित केलेली इतर कोणतीही वित्त संस्था.

बँकिंग सिस्टिम मध्ये पुढील संस्था समाविष्ट नाहीत :

(१) एक्झिम बँक

(२) नाबार्ड

(३) एसआयडीबीआय

(४) आयएफसीआय

(५) आयआयबीआय

**(३) जबाबदा-या (लायाबिलिटीज) मध्ये पुढील बाबी समाविष्ट नाहीत**

(१) भरणा झालेले भांडवल

(२) राखीव निधी

(३) नफा व तोटा लेखेमधील क्रेडिट बॅलन्स

(४) राज्य सरकार, आरबीआय, आयडीबीआय, एक्झिम बँक, नाबार्ड, एसआयडीबीआय, एनएचबी, रिकन्स्ट्रक्शन बँक , नॅशनल को.ऑप.डेवलपमेंट कॉर्पोरेशन ह्यांच्या कडील कर्जे किंवा संबंधित राज्याच्या राज्य सहकारी बँक किंवा संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा केंद्रीय सहकारी बँक ह्यांच्याकडून घेतलेल्या अग्रिम राशी तसेच मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजच्या विरुध्द घेतलेली अग्रिम राशी किंवा कर्ज व्यवस्था.

**(४) निव्वळ जबाबदा-या (लायाबिलिटीज)**

सीआरआर व एसएलआरसाठी जबाबदा-या काढताना, त्या बँकेच्या भारतातील इतर बँकांबाबत असलेल्या बँकिंग सिस्टिम मधील निव्वळ जबाबदा-या हिशेबात घेतल्या जातील. म्हणजे, बँकिंग सिस्टिम मधील इतर बँकांमधील भारतातील ॲसेट्स, बँकिंग सिस्टिम ला असलेल्या एकूण जबाबदा-यांमधून वजा/कमी केल्या जातील.

**(५) लायाबिलिटी टु बँकिंग सिस्टिम मध्ये पुढील गोष्टी समाविष्ट आहेत**

(१) त्या बँकांच्या ठेवी

(२) बँकांकडून घेतलेला पैसा (कॉल मनी/नोटिस डिपॉझिट्स)

(३) बँकांबाबतच्या जबाबदा-यांच्या इतर संकीर्ण बाबी, जसे, बँकांना दिलेली पार्टिसिपेशन प्रमाणपत्रे, बँक ठेवींवर उपार्जित झालेले व्याज इत्यादि.

**(६) बँकिंग सिस्टिम वरील जबाबदा-यांचे वर्गीकरण**

(१) बँकेच्या, बँकिंग सिस्टिम बाबतच्या जबाबदा-यांचे स्थूलमानाने दोन वर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे - डिमांड लायाबिलिटीज व टाईम लायाबिलिटीज

(२) बँकिंग सिस्टिम च्या डिमांड लायाबिलिटीज खालील प्रमाणे वर्गीकृत केल्या गेल्या आहेत.

(अ) युसीबींमधील चालु खात्यात पुढील संस्थांच्या शिल्लक रकमा

* एसबीआय

* एसबीआयच्या दुय्यम बँका

* राष्ट्रीयीकृत बँका

(ब) पुढील प्रकारच्या डिमांड लायाबिलिटीज

(१) युसीबी मधील चालु खात्यात पुढील संस्थांनी ठेवलेल्या शिल्लक रकमा

* आरआरबी बँकिंग कंपन्या - म्हणजे खाजगी क्षेत्रातील बँका व विदेशी बँका

* सहकारी बँका

* इतर अधिसूचित वित्तसंस्था

(२) वरील बँकांच्या मुदतबाह्य (ओव्हरड्यु) टाईम डिपॉझिट्सच्या शिल्लक रकमा

(३) बँकांना दिलेली मागणी केल्यावर देय असलेली पार्टिसिपेशन प्रमाणपत्रे

(४) बँकांच्या ठेवींवर उपार्जित झालेले व्याज (आरआरबी) *

(५) बँकांकडून कॉल मनी स्वरुपात घेतलेले पैसे

बँकिंग सिस्टिम च्या व्याख्येमध्ये

(३) बँकिंग सिस्टिम ला असलेल्या टाईम लायाबिलिटीजमध्ये पुढील बाबी समाविष्ट आहेत

(अ) बँकांकडील सर्व प्रकारच्या ठेवी

(ब) बँकांकडील ठेव  प्रमाणपत्रे

(क) मागणी केल्यावर देय नसणारी बँकांना दिलेली पार्टिसिपेशन प्रमाणपत्रे

(ड) बँकांच्या * टाईम डिपॉझिट/सीडींवर उपार्जित झालेले व्याज

बँकिंग सिस्टिम च्या व्याख्येमध्ये

* ठेवींवर उपार्जित झालेल्या व्याजाच्या रकमेपासून ही रक्कम वर्गीकृत/वेगळी करता येणे शक्य नाही.  उपार्जित झालेले एकूण व्याज, इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज मध्ये दाखविता येईल.

**(७) बँकिंग सिस्टिम जवळील ॲसेट्स**

(१) बँकिंग सिस्टिम कडील चालु खात्यामधील शिल्लक

(२) बँकिंग सिस्टिम मध्ये असलेल्या बँका व अधिसूचित संस्थांमधील इतर खात्यांमधील शिल्लक

(३) बँकिंग सिस्टिममधील बँका व अधिसूचित वित्त संस्थांना, १४ दिवसांपर्यंत कर्जाऊ दिलेला मनी ॲट कॉल व शॉर्ट नोटिस

(४) बँकिंग सिस्टिम ला उपलब्ध केलेली (मनी ॲट कॉल व शॉर्ट नोटिस सोडून) कर्जे

(५) बँकिंग सिस्टिम कडून येणे असलेल्या अन्य रकमा जसे, आंतर बँकीय प्रेषण सुविधेखाली, बँकेच्या इतर बँकांमध्ये (ट्रान्झिट किंवा इतर खात्यात) असलेली रक्कम.

(८) (१) बँकांनी टर्म मनी मार्केटमधील पुढील वित्तसंस्थांना दिलेली कर्जे ही बँकिंग सिस्टिम मधील ॲसेट्स म्हणून धरली जाणार नाहीत. ह्यासाठी, ही कर्जे, बँकिंग सिस्टिम ला असलेल्या जबाबदा-यांविरुध्द नेट-ऑफ केली जाऊ नयेत.

*एक्झिम बँक

*नाबार्ड

*आयएफसीआय

*आयआयबीआय

*एसआयडीबीआय

(२) ह्या वित्तसंस्थांकडून, पुनर्वित सोडून अन्य कर्जे ही लायाबिलिटी टु अदर्सचा एक भाग असू नये आणि ह्यासाठी, राखीव निधीच्या आवश्यकतांसाठी तो निव्वळ डिमांड व टाईम लायाबिलिटीजचा भाग असावा

**(९) लायाबिलिटीज खालील विशिष्ट बाबींचे वर्गीकरण**

खरेदी केलेल्या/डिसकाऊंट केलेल्या बिलांवरील मार्जिन मनी हा बाह्य जबाबदा-या म्हणून समजताना बँकांनी एकसमान कार्यरीत ठेवावी आणि राखीव निधीच्या आवश्यकता ठेवण्यासाठी, त्यात इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज समाविष्ट कराव्यात.

**(i) आंतर-शाखीय खाती**

(अ) आंतर-शाखीय खात्यामध्ये असलेली निव्वळ शिल्लक (नेट बॅलन्स), क्रेडिटमध्ये असल्यास, ती शिल्लक, सीआरआर व एसएलआर साठीच्या एकूण डिमांड व टाईम लायाबिलिटीजमध्ये समाविष्ट केलेल्या, अन्य जबाबदा-या व तरतुदी खाली दाखविल्या जाव्यात.

(ब) २७.०७.९८ नंतर, बँकांनी, आंतर शाखीय खात्यामध्ये पाच वर्षांपेक्षा अधिक काळासाठी आऊटस्टँडिंग असलेल्या क्रेडिट नोंदी, ब्लॉक्ड अकाऊंट म्हणून वेगळ्या कराव्यात आणि त्या, इतर जबाबदा-या व तरतुदी खालील, इतर खाली दर्शवाव्यात. त्यानंतर, क्रेडिटमध्ये असल्यास, इतर जबाबदा-या व तरतुदी खाली किंवा डेबिट असल्यास इतर ॲसेट्स खाली समाविष्ट करण्यासाठी, आंतर शाखीय व्यवहारांची निव्वळ रक्कम काढतेवेळी, ब्लॉक्ड अकाऊंट ची एकूण रक्कम वगळण्यात यावी आणि केवळ शेष क्रेडिट नोंदी म्हणून असलेली रक्कमेचे डेबिट नोंदी

बरोबर नेटिंग करावे.  अशा रितीने, आंतर शाखीय नोंदींची नेट रक्कम ही एक डेबिट शिल्लक असली तरीही, ब्लॉक्ड अकाऊंट मधील शिल्लक, सीआरआर व एसएलआर काढण्यासाठी हिशेबात धरली जाईल.

### (ii) **डिसकाऊंट/खरेदी केलेल्या बिलांवरील मार्जिन मनी**

खरेदी केलेल्या/डिसकाऊंट केलेल्या बिलांवरील मार्जिन मनी हा बाह्य जबाबदा-या म्हणून समजताना बँकांनी एकसमान कार्यरीत ठेवावी आणि राखीव निधीच्या आवश्यकता ठेवण्यासाठी, त्यात इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज समाविष्ट करावे.

### (iii) ठेवींवरील उपार्जित व्याज

(अ) सर्व ठेवी खात्यांवर (बचत, स्थिर, आवर्ती, रोख प्रमाणपत्रे, पुनर्गुंतवणुक योजना इ.) उपार्जित झालेले व्याज हे, सीआरआर व एसएलआर ठेवण्यासाठी, बँकांनी त्यांची एक जबाबदारी (लायाबिलिटी) म्हणून समजावे - मग उपार्जित व्याज प्रत्यक्षात देय झाले असो किंवा ठेवी परत करण्यासाठी ठरलेल्या तारखेपर्यंत ते देय नसो.

(ब) ठेवींवर उपार्जित झालेले व्याज, फॉर्म १ व ८ मध्ये इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज खाली वर्गीकृत केले जावे.

### **(१०) सीआरआर व एसएलआरसाठी बाह्य जबाबदा-या म्हणून न समजण्याची रक्कम**

(१) संबंधित अग्रिम राशींबाबत तडजोड प्रलंबित आहे अशा, आवाहित केलेल्या हमीमधील, डीआयसीजीसी कडील दाव्यांच्या रकमा.

(२) कोर्ट रिसीव्हरकडून मिळालेल्या रकमा

(३) कोर्टाचा निर्णय प्रलंबित असताना विमा कंपनीकडून दाव्यांची तात्पुरती तडजोड म्हणून मिळालेल्या रकमा

(४) संबंधित अग्रिम राशींविरुध्द सेट-ऑफ करणे प्रलंबित असलेल्या, हमी आवाहित केल्यावर ईसीजीसीकडून मिळालेल्या रकमा

**महापरिपत्रक**

**कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर)**

**फॉर्म 'ब'**

**[राज्य सहकारी बँक असलेल्या अनुसूचित बँकेने सादर करावयाचा ]**

**(परिच्छेद ३.१४ अन्वये)**

शुक्रवार @ ------------------------ रोजी व्यवहार बंद होतेवेळी असलेल्या स्थितीचे विवरणपत्र

(जवळच्या हजारापर्यंत रुपये राऊंड ऑफ केले आहेत)

बँकेचे नाव :

**(१) भारतामधील बँकिंग सिस्टिमबाबत असलेली जबाबदारी (लायाबिलिटी) ***

(अ)बँकांकडील डिमांड व टाईम लायाबिलिटीज *****

(१) डिमांड

(२) टाईम

(ब) बँकांकडून कर्जाऊ घेतलेले पैसे *****

(क) इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज @ @

**१ ची बेरीज**

**(२) भारतामधील इतरांबाबतच्या जबाबदा-या**

(अ) एकूण ठेवी (बँकांकडील * सोडून आणि राखीव निधी म्हणून किंवा स्वरुपात कोणताही भाग म्हणून, सहकारी सोसायट्यांनी, राज्य सहकारी बँकेच्या कार्यक्षेत्रात ठेवलेला पैसा सोडून)

(१) डिमांड

(२) टाईम

(ब) कर्जाऊ घेतलेला निधी (रिझर्व बँक, आयडीबीआय, नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेवलपमेंट, एक्झिम बँक ऑफ इंडिया, राज्य सरकार व राष्ट्रीय सहकारी विकास निगम, संबंधित राज्याची राज्य सहकारी बँक किंवा संबंधित जिल्ह्याची केंद्रीय सहकारी बँक सोडून इतर संस्थांकडून)

(क) इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज्

**(२) ची बेरीज**

**एकूण बेरीज १ + २**

**(३) भारतातील बँकिंग सिस्टिममधील ॲसेट्स ***

(अ) बँकांमधील शिल्लक *

(१) चालु खात्यातील

(२) इतर खात्यातील

(ब) कॉल व शॉर्ट नोटिस पैसा

(क) बँकांना * दिलेल्या अग्रिम राशी, म्हणजे, बँकांकडून येणे रक्कम

(ड) इतर ॲसेट्स

**(३) ची बेरीज**

**(४) भारतामधील रोकड** (म्हणजे, हातातील रोकड)

**(५) भारतामधील गुंतवणुकी** (पुस्तकी मूल्याने)

(अ) ट्रेझरी बिल्स, ट्रेझरी डिपॉझिट रिसीट्स, ट्रेझरी बचत ठेवी प्रमाणपत्रे व पोस्टाची दायित्वे ह्यासह केंद्र व राज्य सरकारच्या सिक्युरिटीज्

(ब) इतर मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज्

**(५) ची बेरीज**

**(६) भारतातील बँक क्रेडिट (आंतर-बँकीय अग्रिम राशी सोडून)**

(अ) कर्जे, कॅश व ओव्हर ड्राफ्ट

(ब) खरेदी केलेली व डिसकाऊंट केलेली देशांतर्गत बिले

(१) खरेदी केलेली बिले

(२) डिसकाऊंट केलेली बिले

**(६) ची बेरीज**

**३+ ४+ ५+६ ची बेरीज**

| | | |
|---|---|---|
| (अ) | आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४२ साठी निव्वळ जबाबदा-या बँकिंग सिस्टिम बाबतची निव्वळ जबाबदारी अ भारतातील इतरांबाबतची जबाबदारी | (१-३) + (२); जर (१-३) धनसंख्या किंवा (१-३) ही ऋण संख्या असेल तर फक्त (२) |
| (ब) | ह्या अधिनियमाखाली, आरबीआयकडे ठेवावयाच्या किमान ठेवीची रक्कम (जवळच्या रुपयापर्यंत राऊंड ऑफ केलेली) | = ₹ |
| (क) | बचत बँक खाते (विनियम ७ अन्वये) | |
| | भारतामधील डिमांड लायाबिलिटीज | |
| | भारतामधील टाईम लायाबिलिटीज | |

सही/-

अधिका-यांची सही

(१)(पदनाम) --------------------------------

(२)(पदनाम) --------------------------------

स्थळ :

तारीख :

**(१) भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ खाली रिझर्व बँकेकडून घेतलेले कर्ज कलम :**

(१) १७(२)(अ)

(२) १७(२)(ब) किंवा (४)(क)

(३) १७(२)(बब) किंवा ४(क)

(४) १७(४)(क)

(५) १७(४)(अ)

(२) पुढील संस्थांकडून घेतलेले कर्ज

(१) नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेवलपमेंट अधिनियम १९८१ खाली, खालील कलमांखाली नॅशनल बँकेकडून घेतलेले कर्ज

(अ) २१

(ब) २२

(क) २३

(ड) २४,

(ई) २५

(२) भारतीय स्टेट बँक

(३) इतर बँका

(४) आयडीबीआय

(५) राज्य सरकार

(६) राष्ट्रीय सहकारी विकास निगम

(७) एक्झिम बँक ऑफ इंडिया

(८) संबंधित राज्याची राज्य सहकारी बँक

(९) संबंधित जिल्ह्याची राज्य केंद्रीय सहकारी बँक

**बाब (२) ची बेरीज**

**(३) भारतीय रिझर्व बँकेतील शिल्लक**

**तळटीपा**

# अनुसूचित प्राथमिक (नागरी/सहकारी बँकांनीही त्याच नमुन्यात विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

@ पराक्रम्य संलेख अधिनियम १८८१ (१८८१ चा २६) खाली जेथे, त्या अनुसूचित राज्य सहकारी बँकेच्या एका किंवा अधिक शाखांसाठी सार्वजनिक रजा असेल तेथे, ह्या अहवालात आदल्या कामाच्या दिवशीचे आकडे दिले जावेत, तथापि ते त्या विशिष्ट शुक्रवारचेच समजले जातील.

* अहवालात जेथे बँकिंग सिस्टिम किंवा बँक ही संज्ञा आढळेल तेथे तिचा अर्थ, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम ४२(१) च्या खाली दिलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड (ई) च्या विनियम (१) ते (५) मध्ये संदर्भित अशा बँका किंवा अन्य कोणतीही वित्तीय संस्था असा असेल.

@@१(क) समोरील आकडा, २(क) पासून वेगळा देता येणे शक्य नसल्यास, तोच अंक २(क) समोर द्यावा. अशा बाबतीत बँकिंग सिस्टिमला असलेली निव्वळ जबाबदारी ही, १(अ) व १(ब) ह्यांची एकूण बेरीज, ३ च्या एकूण बेरेजेपेक्षा कितीने अधिक आहे (असल्यास) हे काढावे.

**महापरिपत्रक**

**<u>कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर)</u>**

**सीआरआर व एसएलआरसाठी डिमांड व टाईम लायाबिलिटीज काढणे**

**[अननुसूचित प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना सीआरआरसाठी आणि सर्व प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांसाठी एसएलआरसाठी लागु ]**

**[परिच्छेद ४.१ अन्वये]**

**(१) निरनिराळ्या संज्ञांच्या व्याख्या**

(बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ५६ सह वाचित कलम १८(१) च्या स्पष्टीकरणानुसार)

(१) **सरासरी दैनिक शिल्लक** -

अ)म्हणजे, एखाद्या पंधरवड्याच्या प्रत्येक दिवशी, व्यवहार समाप्त होतेवेळी असलेल्या शिल्लकांची सरासरी.

**(२) पंधरवडा**

ब) म्हणजे शनिवार ते पुढील दुसरा शुक्रवारपर्यंतचा (दोन्हीही दिवस धरुन) कालावधी

**(२) बँकिंग सिस्टिम मध्ये पुढील बाबी येतात**

(१) भारतीय स्टेट बँक

(२) भारतीय स्टेट बँकेच्या दुय्यम बँका

(३) राष्ट्रीयीकृत बँका

(४) प्रादेशिक ग्रामीण बँका

(५) बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ च्या कलम ५ च्या खंड (क) मध्ये व्याख्या केलेल्या बँकिंग कंपन्या, ह्यामध्ये पुढील समाविष्ट आहेत

* खाजगी क्षेत्रातील बँका

* विदेशी बँका,

**[टीप** - भारतात कोणतीही शाखा नसलेल्या विदेशी बँका ह्या बँकिंग सिस्टिम चा कोणताही भाग नाहीत ]

(६) ह्याबाबत केंद्र सरकारने अधिसूचित केलेली इतर कोणतीही वित्त संस्था.

**(३) बँकिंग सिस्टिम मध्ये पुढील संस्था समाविष्ट नाहीत :**

(१) एक्झिम बँक

(२) नाबार्ड

(३) एसआयडीबीआय

(४) आयएफसीआय

(५) आयआयबीआय

**(४) जबाबदा-या (लायाबिलिटीज) मध्ये पुढील बाबी समाविष्ट नाहीत**

(१) भरणा झालेले भांडवल

(२) राखीव निधी

(३) नफा व तोटा लेखेमधील क्रेडिट बॅलन्स

(४) आरबीआय, एक्झिम बँक, नाबार्ड, एसआयडीबीआय, एनएचबी, आयआयबीआय कडून घेतलेली कर्जे

**(५) निव्वळ जबाबदा-या (लायाबिलिटीज)**

सीआरआर व एसएलआरसाठी जबाबदा-या काढताना, त्या बँकेच्या भारतातील इतर बँकांबाबत असलेल्या बँकिंग सिस्टिम मधील निव्वळ जबाबदा-या हिशेबात घेतल्या जातील. म्हणजे, बँकिंग सिस्टिम मधील इतर बँकांमधील भारतातील ॲसेट्स, बँकिंग सिस्टिम ला असलेल्या एकूण जबाबदा-यांमधून वजा/कमी केल्या जातील.

**(६) लायाबिलिटी टु बँकिंग सिस्टिम मध्ये पुढील गोष्टी समाविष्ट आहेत**

(१) त्या बँकांच्या ठेवी

(२) बँकांकडून घेतलेला पैसा (कॉल मनी/नोटिस डिपॉझिट्स)

(३) बँकांबाबतच्या जबाबदा-यांच्या इतर संकीर्ण बाबी, जसे, बँकांना दिलेली पार्टिसिपेशन प्रमाणपत्रे, बँक ठेवींवर उपार्जित झालेले व्याज इत्यादि.

**(७) बँकिंग सिस्टिम वरील जबाबदा-यांचे वर्गीकरण**

(१) बँकेच्या, बँकिंग सिस्टिम बाबतच्या जबाबदा-यांचे स्थूलमानाने दोन वर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे - डिमांड लायाबिलिटीज व टाईम लायाबिलिटीज

(२) बँकिंग सिस्टिम च्या डिमांड लायाबिलिटीज खालील प्रमाणे वर्गीकृत केल्या गेल्या आहेत.

(अ) युसीबींमधील चालु खात्यात पुढील संस्थांच्या शिल्लक रकमा

* एसबीआय

* एसबीआयच्या दुय्यम बँका

* राष्ट्रीयीकृत बँका

(ब) पुढील प्रकारच्या डिमांड लायाबिलिटीज

(१) युसीबी मधील चालु खात्यात पुढील संस्थांनी ठेवलेल्या शिल्लक रकमा

* आरआरबी बँकिंग कंपन्या - म्हणजे खाजगी क्षेत्रातील बँका व विदेशी बँका

* सहकारी बँका

* इतर अधिसूचित वित्तसंस्था

(२) वरील बँकांच्या मुदतबाह्य (ओव्हरड्यु) टाईम डिपॉझिट्सच्या शिल्लक रकमा

(३) बँकांना दिलेली मागणी केल्यावर देय असलेली पार्टिसिपेशन प्रमाणपत्रे

(४) बँकांच्या ठेवींवर उपार्जित झालेले व्याज (आरआरबी) *

(५) बँकांकडून कॉल मनी स्वरुपात घेतलेले पैसे

बँकिंग सिस्टिम च्या व्याख्येमध्ये

(३) बँकिंग सिस्टिम ला असलेल्या टाईम लायाबिलिटीजमध्ये पुढील बाबी समाविष्ट आहेत

(अ) बँकांकडील सर्व प्रकारच्या ठेवी

(ब) बँकांकडील ठेव प्रमाणपत्रे

(क) मागणी केल्यावर देय नसणारी बँकांना दिलेली पार्टिसिपेशन प्रमाणपत्रे

(ड) बँकांच्या * टाईम डिपॉझिट/सीडींवर उपार्जित झालेले व्याज

बँकिंग सिस्टिम च्या व्याख्येमध्ये

* ठेवींवर उपार्जित झालेल्या व्याजाच्या रकमेपासून ही रक्कम वर्गीकृत/वेगळी करता येणे शक्य नाही. उपार्जित झालेले एकूण व्याज, इतर डिमांड व टाईम लायाबिलिटीज मध्ये दाखविता येईल.

(८) बँकिंग सिस्टिम मधील चालु खात्यातील शिल्लक

* एसबीआय

* एसबीआयच्या दुय्यम संस्था

* राष्ट्रीयीकृत बँका

* बँकिंग कंपन्या म्हणजे, खाजगी क्षेत्रातील बँका व विदेशी बँका

* इतर अधिसूचित वित्तीय संस्था.

(२) बँकिंग सिस्टिम मध्ये असलेल्या बँका व अधिसूचित संस्थांमधील इतर खात्यांमधील शिल्लक

(३) बँकिंग सिस्टिममधील बँका व अधिसूचित वित्त संस्थांना, १४ दिवसांपर्यंत कर्जाऊ दिलेला मनी ॲट कॉल व शॉर्ट नोटिस

(४) बँकिंग सिस्टिम ला उपलब्ध केलेली (मनी ॲट कॉल व शॉर्ट नोटिस सोडून) कर्जे

(५) बँकिंग सिस्टिम कडून येणे असलेल्या अन्य रकमा जसे, आंतर बँकीय प्रेषण सुविधेखाली, बँकेच्या इतर बँकांमध्ये (ट्रान्झिट किंवा इतर खात्यात) असलेली रक्कम.

**(९)** (१) बँकांनी टर्म मनी मार्केटमधील पुढील वित्तसंस्थांना दिलेली कर्जे ही बँकिंग सिस्टिम मधील ॲसेट्स म्हणून धरली जाणार नाहीत. ह्यासाठी, ही कर्जे, बँकिंग सिस्टिम ला असलेल्या जबाबदा-यांविरुध्द नेट-ऑफ केली जाऊ नयेत.

*एक्झिम बँक

*नाबार्ड

*आयएफसीआय

*आयआयबीआय

*एसआयडीबीआय

(२) ह्या वित्तसंस्थांकडून, पुनर्वित सोडून अन्य कर्जे ही लायाबिलिटी टु अदर्सचा एक भाग असू नये आणि ह्यासाठी, राखीव निधीच्या आवश्यकतांसाठी तो निव्वळ डिमांड व टाईम लायाबिलिटीजचा भाग असावा

**(१०)** प्राधान्य क्षेत्रातील उद्दिष्टे साध्य होण्यामधील तुटीसाठी, एसआयडीबीआय/नाबार्डमध्ये ठेवलेल्या ठेवींना, बँकिंग सिस्टिममधील ॲसेट्स म्हणून दाखविले जाऊ नये आणि अशा ठेवींचे सीआरआर व एसएलआर आवश्यकतांसाठी, निव्वळ डीटीएल काढताना नेटिंग-ऑफ केले जाऊ नये. एसआयडीबीआय/नाबार्ड मध्ये ठेवलेल्या रकमा, फॉर्म १ व फॉर्म ८ मध्ये तळटीपेद्वारे दर्शविल्या जाव्यात.

**(११) लायाबिलिटीज खालील विशिष्ट बाबींचे वर्गीकरण**

